# किल्ले कर्नाळा



चंद्रशेखर सावंत

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# किल्ले कर्नाळा

(दुर्गदर्शन)

## लेखक : चंद्रशेखर सावंत

# किल्ले कर्नाळा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

किल्ले कर्नाळा

लेखक : चंद्रशेखर सावंत

शिवकोकण-ऐक्यवर्धक सहकारी गृहनिर्माण संस्था, ए-९०२, ए-विंग, ए-१, ९ वा मजला,

वेस्टर्न एक्सप्रेस हायवे च्या जवळ, शांताराम तलाव,

मालाड (पूर्व), मुंबई : ४०० ०९७

भ्रमणध्वनी : +९१ ९९३०५६०४५८

ब्लॉग : cnsawant.blogspot.in

ईमेल : shekharsawant1111@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : दिवाळी २७ ऑक्टोबर २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## *अर्पण पत्रिका*

निर्विवाद सिंहपुरूष व ज्यांचे नाव कानावर येताच

छाती अभिमानाने फुलवणाऱ्या

हिंदवी स्वराज्य संस्थापक

छत्रपती शिवाजी महाराज

यांच्या चरणी कृतज्ञतापुर्वक अर्पण.

*--/चंद्रशेखर सावंत*

## *!आभार!*

सर्वप्रथम ‘ई-साहित्य प्रतिष्ठान’ या संपूर्ण समूहाचे चे मनापासून आभार मानतो कि त्यांनी मराठी लेखक व वाचक यांना त्यांची असलेली वाचनाची व लिखाणाची आवड वृद्धिंगत होत जावी यासाठी तसेच आजकालच्या इंटरनेट च्या युगात Ebook स्वरूपात पुस्तके निर्माण करण्याचे फार मोठे सत्कार्य त्यांच्याकडून सुरु आहे. याचा मला फार आनंद वाटतो व मनापासून अभिमान आहे.

ई-साहित्य प्रतिष्ठान या संकेतस्थळावर माझे पहिले 'किल्ले सोंडाई' हे ई-पुस्तक १५ ऑगस्ट २०१९ रोजी प्रकाशित झाले याचा मला फार आनंद आहे. तत्पूर्वी मी केलेल्या गडांवर गिर्यारोहणाचे अनुभवाचे लेखन मी माझ्या ब्लॉग वर केले आहे. ई-साहित्य प्रतिष्ठान मुळे मी दुर्गदर्शन किंवा दुर्ग दुर्घट भारी या विषयाशी जोडला गेलो.

संपूर्ण ई-साहित्य प्रतिष्ठान चे मन:पासून आभार व असंख्य शुभेच्छा!

आपलाच

--/ चंद्रशेखर सावंत

मालाड, मुंबई : ४०० ०९७

# *स्वपरिचय*



**संपूर्ण नाव:** चंद्रशेखर नम्रता नथुराम सावंत

**टोपण नाव :** शेखर किंवा विकी

**गाव :** मु.पो. नांदवी, जिल्हा: रायगड - ४०२ १०३

**राहण्याचा पत्ता:** शिवकोकण-ऐक्यवर्धक सहकारी गृहनिर्माण संस्था,

ए-१, ए-९०२, ९ वा मजला, पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या जवळ,

शांताराम तलाव, मालाड (पूर्व), मुंबई : ४०० ०९७

**भ्रमणध्वनी:** +९१ ९९३० ५६ ०४५८

**ब्लॉग:** cnsawant.blogspot.in

**ई-मेल:** shekharsawant1111@gmail.com

**छंद:** ट्रेकिंग, ट्रॅव्हल आणि लिखाण

# किल्ले कर्नाळा

मुंबईहून कोकणात जाताना पनवेल पार केल्यानंतर डाव्या बाजूला 'कर्नाळा पक्षी अभयारण्य' दिसते व जरा नजर वर केल्यानंतर एक उंच हाताच्या अंगठाच्या आकारासारखा सुळका दिसतो. हा कर्नाळा किल्ला समुद्रसपाटी पासून ४४५ मीटर उंचीवर आहे. माझ्या लहानपणापासून मी जेव्हा कोकणात जाताना मुंबई-गोवा महामार्गातून प्रवास करायचो तेव्हा येते-जाते वेळी माझी नजर त्या सुळक्यावर जायायचीच. आजपर्यंत मित्र समूहसमन्वयेत अनेक ट्रेक केले पण आयुष्यात आत्ता असे वाटत होते कि 'सोलो ट्रेक' (व्ययक्तिक केलेले गिर्यारोहण) हे करण्याची इच्छा मनाला खुणावत होती आणि माझ्यासाठी आयुष्यात ०८ सप्टेंबर रोजी प्रथम सोलो ट्रेक करण्याचा मुहूर्त ठरला.

पनवेल विभागात येणारा आणि रायगड जिल्ह्यात असणारा ५० मीटर उंचीचा उत्तुंग कावळकडा असून हा किल्ला त्याच्या अंगठ्या सारख्या आकारामुळे सर्वांचे लक्ष नेहमीच वेधून घेतो. कर्नाळा हा किल्ला प्राचीन काळापासून  प्रसिध्द आहे. ह्या किल्ल्याचा उल्लेख यादव काळात आढळतो,

याची इतिहासात नोंद आहे. पुरंदरच्या तहानुसार हा किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला. पुरंदरच्या तहामध्ये मोगलांना देण्यात येणाऱ्या २३ किल्ल्यांपैकी त्यात कर्नाळा किल्ल्याचा समावेश होता, यानंतर सन १६७० साली मराठ्यांनी हा किल्ला परत स्वराज्यात आणला. हा किल्ला स्वराज्यात आल्यावर, या किल्ल्यावर किल्लेदार म्हणून आद्यक्रांतिकारक ‘वासुदेव बळवंत फडके’ यांचे आजोबा ‘अनंतराव फडके’ यांची नेमणूक करण्यात आली होती. कर्नाळा किल्ला प्रसिद्ध आहे तो येथे असलेल्या पक्षी अभयारण्यामुळे.

ह्या ट्रेक साठी माझे काहीच पूर्वनियोजित नव्हते फक्त अगोदरच्या दिवशी म्हणजेच ७ सप्टेंबर ला संध्याकाळी मनात कुठे इच्छा व्हायायला लागली कि उद्याचा रविवार फुकट जाता काम नये, आयुष्यातला वैफल्यग्रस्त पणा दूर करण्यासाठी गरज होती ती फक्त निसर्गाच्या सानिध्यात रमण्याची, आयुष्य पुन्हा नवचैतन्यमय करण्याची पण एक शंका मात्र मनाला सारखी हिणावत होती कि काहीच पूर्वनियोजित नसून निघतोय खरा, पण सर्व वेळेत व्हायायला पाहिजे.  रविवार असल्यामुळे ०८.३०/०९.०० च्या आसपास उठलो. न्याहरी, अंघोळपाणी वैगरे आटपेपर्यंत घरातूनच निघायला १०.०० वाजलेले. सायन-वाशी ला झालेली वाहतुकीची कोंडी व वाटेत काही ठरावीक येणारे थांबे ह्या सर्वातून मार्ग काढत कर्नाळा पक्षी अभयारण्य या फाटकाच्या येथे पोहोचेपर्यंत अंदाजे ०१.४५ झालेले. शंका होती कि आपण व्यवस्थित ट्रेक करून परतू का नाही? तेथे असलेल्या सुरक्षा रक्षक दलाच्या एका व्यक्तींना मी विचारले कि वर माथ्यावर पोहोचायला अंदाजे किती वेळ लागेल? २ तास असे उत्तर

मिळताच मनात प्रश्न उपस्थित झाला कि आत्ता माझ्याकडे फक्त ठरावीक वेळ आहे. त्या वेळेत मला काहीही करून गड चढायचाच होता. पुढे जाताच उजव्या दिशेला संग्रहालयात ठेवलेले पक्षी दिसू लागले. त्यांना फक्त वरच्यावर बघितले व पुढील प्रवासास सुरुवात केली. घनदाट जंगलातील सावली आणि पक्ष्यांचा सुमधुर आवाजाचा आनंद हा मनाला फार प्रेरित करत होता. ह्या अभयारण्यात १४१ प्रकारचे पक्षी आहेत, ज्यांची नावे तिथे असलेल्या फलकावर लावली आहेत. किल्ल्याच्या दिशेला मार्गी लागताच वाटेत एक मावशी दिसली, मला ती म्हणाली, बावा किल्ल्यावर जाणार आहेस का? मी म्हणालो हो, आजी! किती वेळ लागेल वर चढायला? ती म्हणाली जाशील जाशील, एकटाच आहेस ना... मग जाऊन सुद्धा लगेच येशील. पाणी वैगरे ठेवले आहेस ना बरोबर? मी म्हणालो हो आजी सर्व काही आहे बरोबर... हेच तिचे मला मिळालेले सुरवातीचे प्रेरणादायक बोल व पुढे सकारात्मक विचाराने गड चढण्यास मार्गी झालो. टप्प्याटप्याने गडावर थांबे आहेत पण मी काही जास्त थांबण्याचा प्रयत्न नाही केला कारण निवडक वेळेत मला गड चढायचे होते. पुढे किर्रर-किर्रर आवाज चालू झाला व सर्वत्र अगदी घनदाट जंगल ह्या वेळेतून वाट काढणे माझ्यासाठी फार नवीन होते कारण मला तो अनुभव घ्यायायचा होता. वर काही अंतरावर पोहोचताच उजव्या बाजूला म्हणजेच नागेश पॉईंट या ठिकाणी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग, रसायनी तसेच पाताळगंगेचे दर्शन होते. तिथे थोडा वेळ मी थांबलो कारण ठरलेल्या वेळेच्या आत मी जास्तीतजास्त अंतर पार केलेले व पुढे २० मिनिटातच गडाचा माथा येणार होता. थांबलेल्या ठिकाणापासून निसर्गाचा खरा आस्वाद येण्यास

सुरुवात होत असतानाच पुढे टप्प्या-टप्प्याने इतिहासातील वास्तूंचे दर्शन व्हायायला सुरुवात झालेली.

किल्ल्याचा माथा लहान असून समोरूनच अंगावर येणारा अवाढव्य सुळका हा नयनात मावेनासा होतो व सतत त्याला डोळेभरून पाहावेसे वाटते. सुळक्याच्या पायथ्याशी पाण्याची टाकी आणि धान्य कोठार आहे. सुळक्याच्या खाली असलेल्या चहू बाजूंनी पाण्याच्या खोदीव टाक्या आश्चर्यचकित करून टाकतात. सुळका चढण्यासाठी प्रस्तरारोहणाचे तंत्र येणे आवश्यक आहे सुळक्याच्या ठिकाणी पाठ करताच समोरून पृथ्वीवरील स्वर्ग म्हणजे कोकण, या ठिकाणी घेऊन जाणारा महामार्ग नजरेस पडतो. किल्ल्याची तटबंदी ढासळलेल्या अवस्थेत आहे. किल्ल्यावर भवानी मातेचे मंदिर आहे. भवानी मंदिराच्या जवळच ढासळलेल्या अवस्थेत वाडा असून वाड्याच्या जवळ शंकराची पिंड आहे. माथेरान, राजमाची, प्रबळगड, मलंग, तसेच माणिकगड इत्यादी गडांचे दर्शन वाटेतून होत असते. ह्या सर्वांचे दर्शन होत असतानाच, मला वाटेत एक दुसरा 'सोलो ट्रेकर' भेटला. तेथे त्याची आणि माझी मैत्री जमली व पुढे उतरते वेळी आम्ही दोघं एकत्र गड उतरण्यास सुरुवात केली व परतीच्या प्रवासास सुरुवात केली.

अश्याप्रकारे माझ्या आयुष्यातला पहिला सोलो ट्रेक यशस्वी होऊन परतत असताना मनात एक वेगळ्या प्रकारचा आनंद द्विगुणित होत होता.

**झालेल्या अविस्मरणीय नजाऱ्यांचे टिपण्यात आलेले छायाचित्र पुढीलप्रमाणे.**




कर्नाळा पक्षी अभयारण्याचे मुख्य प्रवेशद्वार




गडावर जाण्यासाठी लावण्यात आलेले दिशा दर्शक



पायवाट









संग्रहालयात ठेवण्यात आलेले ससे


WAY TO KARNALA
FOR
कर्नाळा किल्याकडे
मार्ग



वाटेत लाभलेले कर्नाई देवीचे मंदिर



निवांत परिसर



द्वाराच्या दोन्हीबाजूला करण्यात आलेले कातळी कोरीव काम



सुळक्याच्या समोर असलेल्या माची वरून टिपलेले द्वाराचे छायाचित्र





सुळका आणि समोर असलेल्या माचीवर जाण्यासाठी असलेली पायवाट



जवळ आलेला सुळका नयनात मावेनासा होतो.













उंचवट्यावरून होणारे पाताळगंगेचे दर्शन



पायवाट






नागेश पॉईंट येथे लावण्यात आलेले फलक




किल्ले कर्नाळ्यावर आधारित माहिती फलक



घनदाट अरण्य (मार्ग स्वर्गाचा)




वाटेत असलेले सागाचे झाड


About Karnala Bird Sanctuary
कर्नाळा पक्षी अभयारण्याविषयी
KARNALA BIRD SANCTUARY


View Points In Karnala Bird Sanctuary
No.
View Point
Location
Approx Time To Reach
Approx Time To Return
Sighting
कर्नाळा पक्षी अभयारण्यामधील दर्शनीय स्थळे
KARNALA BIRD SANCTUARY

कर्नाळा पक्षी अभयारण्याविषयी तसेच परिसरातील दर्शनीय स्थळे यांचे असलेले फलक






१४१ पक्ष्यांची नावे असलेले फलक





संग्रहालयात ठेवण्यात आलेला मोर



मनशांती साठी मिळालेला सुंदर छोटासा धबधबा




मुख्य उंचवट्याच्या काही अंतराच्या अगोदर वाटेत असलेले कर्नाळा किल्ल्याविषयी माहिती देण्यात येणारे फलक.

गेलात तर अवश्य वेळ काढून वाचा!



वाटेत मला भेटलेला माझ्यासारखाच सोलो ट्रेकर - चिन्मय

- गडावर जाण्यासाठी लागणारा वेळ :

कर्नाळा पायथ्यापासून १.५ तास लागतात.

- राहण्याची सोय :

किल्ल्त्यावर राहण्याची सोय नसून मात्र किल्ल्याच्या पायथ्याच्या असणाऱ्या हॉटेल्स मध्ये किंवा शासकीय विश्रामात राहण्याची सोय होते.

- जेवणाची सोय :

किल्ल्याखाली हॉटेल्स आहेत तेथे चांगल्या पद्धतीने जेवणाची सोय होते.

- पाण्याची सोय :

गडावर बारामही पिण्याच्या पाण्याचे टाके आहे.

- उंची : ४४५ मीटर
- कर्नाळा अभयारण्यामध्ये असलेली प्रत्येकी प्रवेश फी : रुपये ३५

*--/ चंद्रशेखर सावंत*




कर्नाळा परिसराचा नकाशा

# गडाच्या मुख्य ठिकाणी पोहोचण्यासाठी नकाशे




पनवेल लोहमार्ग ते कर्नाळा पक्षी अभयारण्य




रसायनी ते कर्नाळा पक्षी अभयारण्य

ऋणनिर्देश :नकाशा : TreKshitiZ Sanstha, Google Maps.

**ई साहित्य प्रतिष्ठान** अकरा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची,डॉ. स्मिता दामले यांची पाच, डॉ. वृषाली जोशी यांची तीन अशा

अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान

साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com